पंडित दीनदयाळ शिक्षण संस्था,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

## फुलंब्री जि. औरंगाबाद

# सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ

# अहवाल

## 2019-2020


प्रा. विजय पांडे

समिती प्रमुख,

सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ

# सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ

## अहवाल- 2019-2020

### वार्षिक अंकाचे प्रकाशन

10 ऑगस्ट 2019 रोजी सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने “महात्मा गांधी” या विषयावरील महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. हरिभाऊ बागडे नाना, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव श्यामसुंदर नाईक, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. विजय पांडे यांनी संपादित केलेल्या या वार्षिक अंकात एकूण 30 विद्यार्थ्यांनी लिहिलेले लेख छापण्यात आले.




1 वार्षिक अंकाचे प्रकाशन करतांना मान्यवर

## प्रतिनिधी निवड

सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांचे विशेष प्रतिनिधी त्याच्या विषयाच्या विभागप्रमुखांनी निवडून सामाजिक शास्त्र विभागाकडे सादर केली. इतिहास विभाग प्रतिनिधी शिवानी कडुबा चंद्रे, राज्यशास्त्र विभागाचा प्रतिनिधी सोमीनाथ कडुबा सहाने, अर्थशास्त्र विभागाचा प्रतिनिधी राजू खरात, विभागात प्रतिनिधी दीपाली बोलकर यांची निवड करण्यात आली त्यांनी वर्षभर सामाजिक शास्त्राच्या कार्यक्रम उपक्रमात सहभाग घेतला.

## भित्तीपत्रकाचे प्रकाशन

सामाजिकशास्त्रे व आंतरविद्याशाखीय संबंध या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन 26 सप्टेंबर 2019 रोजी प्रा. डॉ.विनोद बोरसे, प्रा.डॉ. कारभारी भानुसे प्राचार्य डॉ. एस आर टकले समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे प्रमुख विजय पांडे यांच्या हस्ते करण्यात आले.



श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

राज्यशास्त्र

अर्थशास्त्र

इतिहास

समाजशास्त्र

# सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन

महाविद्यालयातील सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन 26 सप्टेंबर 2019 रोजी मुलगामहाविद्यालयातील सभागृहात डॉ. विनोद बोरसे, इतिहास विभाग, आसारामजी भांडवलदार महाविद्यालय देवगाव रंगारी यांच्या हस्ते सकाळी 11 वाजता करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी सामाजिक शास्त्रांचे मानवी जीवनातील मूल्य या संदर्भाने विवेचन केले.




2 सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ उद्‌घाटन प्रसंगी बोलतांना डॉ. विनोद बोरसे

# वार्षिकांक 2020-21

2020-21 मध्ये नैतिक मूल्य या विषयावर वार्षिक अंक काढण्याचे बैठकीत ठरवण्यात आले.  त्यानुसार सूचना काढून विद्यार्थ्यांना वेगवेगळे विषय सूचना फलकावर लावण्यात आले.